**(सोबत शैक्षणिक संस्थांमध्ये होणा–या छेडछाडीवर प्रतिबंध करण्याकरता सर्व शैक्षणिक संस्था कार्यालये/संस्था महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करणेबाबत शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग परिपत्रक क्रमांक इएसटी२०१२/प्र.क्र.४३२/आस्था/१, दिनांक १०/०१/२०१३ ची प्रत)**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/शैवी/२०१३/431
दि. / /२०१३ 13 FEB 2013

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदवीका व पदवुत्तर पदवी संस्था, नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सहपत्रः– शासन परिपत्रक

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रतः– प्रोग्रामर हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता

शैक्षणिक संस्थांमध्ये होणा-या मुलींच्या छेडछाडीवर प्रतिबंध करण्याकरता सर्व शैक्षणिक संस्था कार्यालये/संस्थेत महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करणे

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र -इएसटी-२०१२/प्र.क्र.४३२/आस्था-१,
मंत्रालय विस्तार, मुंबई-३२.
दिनांक:- १० जानेवारी, २०१३

**<u>परिपत्रक</u>**

राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये मुलीवर होणारे हल्ले तसेच विनयभंग/छेडछाड घटनांना प्रतिबंध करण्याबाबत अध्यक्ष नॅशनल स्टुडंट युनियन ऑफ इंडिया (आय), मुंबई यांनी व इतर विद्यार्थी प्रतिनिधी यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४/११/२०११ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संचालनालये व सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे त्यांच्या अधिनस्त सर्व शासकीय कार्यालये/निमशासकीय कार्यालये/ शासकीय/अनुदानित/विना अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये, मुलींच्या छेडछाडीस प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना करण्याबाबत निदेश देण्यात येत आहेत-

**१) शैक्षणिक संस्थामधील होणा-या छेडछाडीबाबत मुलींच्या तक्रारीचा विचार करुन त्यांना मदत होण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे-**

कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक अत्याचारासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार(विशाखा जजमेंट) प्रत्येक आस्थापनेने महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक आहे. <u>त्यानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेत अशा प्रकारची समिती स्थापन करण्यात यावी.</u> त्यामध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी (महिला) समावेश असावा व सदर समितीने दर १५ दिवसातून एकदा बैठक घेऊन प्राप्त होणा-या तक्रारींचा आढावा घेऊन त्याप्रमाणे शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखास व पोलीस यंत्रणेस अवगत करावे.

**२) शैक्षणिक संस्थांमधील होणा-या छेडछाडीबाबत शैक्षणिक सत्रांमध्ये चर्चासत्र आयोजित करावे.**

विद्यार्थीनी व महिला यांचा विनयभंग तसेच छेडछाड व तत्सम घटनांबाबत संबंधीतांनी तक्रार कोठे करावी, तसेच अशा प्रकारचा गुन्हा घडल्यास आरोपींवर केल्या जाणा-या फौजदारी कारवाई व शिक्षेचा

पत्र प्राप्त झाले
1 JAN 2013

तपशिल याबाबत शैक्षणिक सत्रांमध्ये चर्चासत्र आयोजित करावे यामध्ये विद्यार्थीनींना याबाबत समुपदेशन करण्यात यावे.

सदर कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/कार्यालयाने यांनी काटेकोरपणे करावी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शैला तारगे-पाटील)
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति
सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, -"-
संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (तंत्रशिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (ग्रंथालय), ग्रंथालय संचालनालय, मुंबई.
संचालक (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कक्ष अधिकारी, (मकक), महिला व बाल विकास विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
मा.प्रधान सचिवांचे स्वीय सहायक.
निवडनस्ती (आस्थापना)